# टाटा पॉवर क्लब एनर्जीकडून
# बालदिनाचे सेलिब्रेशन

मुंबई : टाटा पॉवर या वीजनिर्मिती क्षेत्रातील खाजगी कंपनीच्या माध्यमातून सुरू असलेल्या क्लब एनर्जीच्या माध्यमातून मंगळवारी बालदिनाचे सेलिब्रेशन करण्यात आले. क्लब एनर्जीच्या पवार पब्लिक स्कूल, भांडुप आणि पवार पब्लिक स्कूल चांदिवली येथील विद्यार्थ्यांनी व त्यांच्या शिक्षकांनी बालदिनाच्या निमित्ताने जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते. नद्यांचे संवर्धन राखण्यासाठी प्रत्येकाने मोलाची भूमिका बजावण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. जनजागृती रॅलीदरम्यान मुलेच ऊर्जा संवर्धनची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर बनली होती. २५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या शिक्षकांनी या रॅलीत आपला सहभाग नोंदवला होता. पाणीपुरवठा करणाऱ्या नद्या आणि जलस्त्रोतांचे संवर्धन करणे, याबाबत जागरूकता निर्माण करणे, या उद्दिष्टांबरोबरच पाणी प्रदूषण रोखा, या घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या. या वेळेस मुलांनी पथनाट्य सादर केले. याबाबत टाटा पॉवरचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना यांनी सांगितले की, आजची मुले उद्याचे भवितव्य असून, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान मौल्यवान आहे. क्लब एनर्जीचा उपक्रम भारतातील ५०० शाळांमध्ये पोहोचला असून, १५ दशलक्षपेक्षा जास्त लोकांना जागरूक करण्यात आले.